महोदय,

२२ मार्चच्या दैनिक सकाळच्या अंकातील 'प्रश्नमंजुषेतील ' उत्तर तपासून पहावे. ढोबळमानाने १५ दिवसात चंद्र सूर्यास्ताला उगवण्या ऐवजी सूर्योदया बरोबर उगवतो. म्हणजेच ३० घटिका उशीर १५ दिवसात होतो. म्हणजेच रोज २ घटिका किंवा ४८ मिनटे.

दैनिक सकाळ तसेच साप्ताहिका मध्ये जनहिताचे कित्येक मुद्दे मांडले जातात. त्यावर विद्वानांचे लेख येतात. परंतु सामान्याना काय वाटते त्याला प्रसिद्धी मिळत नाही. तेंव्हा आपल्याला विनंती आहे की, सामान्यांचे जटील प्रश्नावरील विचाराना कधीतरी का होईना प्रसिद्धी द्यावी. माझे थोडक्यात विचार खालील प्रमाणे:-

- **अंधश्रद्धा**:- अंधश्रद्धा निर्मुलनासाठी देव ह्या संकल्पनेचा उपयोग करून घ्यावा.
- **गणेशोत्सव**:- गणेशोत्सवाचा लोकमान्य टिळकाना अभिप्रेत असलेला अर्थ आधुनिक साधनांचा उपयोग करून आपण प्रत्यक्षात आणू शकतो. त्या योगे प्रबोधना बरोबर प्रदूषण कमी करू शकतो.
- **पक्षांतर**:- पक्षांतर पूर्णपणे रोखता येणार नाही. परंतु, त्यावर जालीम बंधन घालता येणे शक्य आहे. त्रिसुत्रीचा उपयोग करावा. (१) उमेदवाराने परिपूर्ण माहिती मतदाराना देणे बंधनकारक, (२) उमेदवाराने कमीतकमी ०.००५ टक्के मतदाराकडून अनुमोदन घेणे अत्यावश्यक (३) उमेदवार अर्ज भरण्याच्या दिवशी सलग सहा वर्षे राजकीय पक्षाचा सभासद तरी असावा अगर अपक्ष तरी असावा. यामध्ये आणखीही बंधने घालता येतील.
- **भ्रष्टाचार**:- निवडणूक खर्च हे भ्रष्टाचाराचे मुख्य कारण आहे. शेवटी हा खर्च सर्वसामान्यांच्या खिशातूनच केला जातो. तेंव्हा हा खर्च सरकानेच करावा.
- **धर्मनिरपेक्षता**:- आता पर्यंत धर्म तसेच धर्मनिरपेक्षता दोन्हीचा उपयोग सर्व राजकीय पक्षानी शिडी म्हणूनच केला. भारतीय लोक स्वभावानेच धर्मनिरपेक्ष आहेत. राजकीय पक्ष विनाकारण याच्या आडोशाने जनतेत फूट पाडत आहेत.
- **कायदे**:- कोठलाही कायदा किंवा नियम असा असला पाहिजे की, लोकाना पाळता येईल. उदाहरणार्थ (१) हेल्मेटची सक्ती करा परंतु, तत्पूर्वी दुचाकी बनवणाराना ती सुरक्षितपणे दुचाकीवर ठेवण्याची सोय करण्याची सक्ती करा. दुचाकीच्या किंमतीत २ हेल्मेटची किंमत मिळवून दुचाकी बरोबरच देवून टाका. म्हणजेच नवीन गाडी घेणाराना हा नियम पाळणे सुलभ होईल. गाड्यांच्या नंबर प्लेट बद्दलही असाच नियम करावा. (२) शहरातील बहुतेक अपघात चौकात किंवा जेथे एका रस्त्याला दुसरा रस्ता मिळतो तेथे होतात. ऱस्त्याची बांधणी असी करता येईल की, निरनिराळ्या मार्गाचे लोक एकमेकापासून दूर राहतील.
- **झोपडपट्टी**:- झोपडपट्टीतील लोकाना स्वस्त भाड्याने छोटी घरे पालिकेला कांहीही खर्च न करता उपलब्ध करून देता येतील. बंगले धारकाना खात्रीशीर घरकामा करता बाई पाहिचे असते. तेंव्हा बंगले धारकाना २० ते २५ चौरस फूट जादा बांधकामाला परवानगी द्या.

या तसेच आणखी कांही विषयावर माझे विचार लेखांकित केले आहेत. आपणाला वेळ असेल तर कळवावे. मी पाठवून देईन.